"महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांचे पत्ररूपी गदय:वाङ्मय एक चिकित्सक अभ्यास"

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत,
'मराठी' विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी
सादर करण्यात येणाऱ्या

शोधप्रबंधाचा आराखडा.

*** संशोधक ***

सौ. दुर्गा बापुसाहेब जाधव,
एम. ए. बी. एड्. (मराठी),
भ्रमणध्वनी : 9422217711
ई-मेल : udhananjali@gmail.com
Category : S.E.B.C.

*** मार्गदर्शक ***
प्रा. डॉ. आनंद गोविंदराव इंजेगावकर,
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
स्व. नितीन महाविद्यालय पाथरी जि. परभणी

मार्च -2019

"महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांचे पत्ररूपी गदय:वाङ्मय एक चिकित्सक अभ्यास"

---

19 व्या शतकामध्ये भारतीय समाज जीवनात विविध स्थित्यांतरे झाली. ब्रिटीश, फ्रेंच, पोर्तुगीज आणि डच इत्यादी राजकीय सत्तेच्या गुलामीमध्ये समाज अडकला होता. भारतातील परंपरागत राजेशाही राजवट नाहीशी होऊन नवी गुलामीची राजवट प्रस्थापित होऊ पाहत होती. अशा राजकीय-सामाजिक स्थितीमध्ये बडोदा संस्थानचे छत्रपती सयाजीराव गायकवाड भारतीय स्वातंत्र्यासाठी, साहित्य निर्मितीसाठी, सामाजिक-राजकीय समतेसाठी, शिक्षण व कृषिसाठी नवनवीन योजना, धोरणे आपल्या संस्थानमध्ये राबवत होते. याचा परिणाम संपूर्ण भारतीय समाज जीवनावर होत होता.

सयाजीराव गायकवाड यांनी शिक्षणासाठी, स्वातंत्र्यासाठी आणि साहित्य निर्मितीसाठी अनन्य साधारण कार्ये केलेले आहे. परदेशी भाषेतील ग्रंथ भाषांतरासाठी प्रोत्साहन दिले. त्यासाठी शिष्यवृत्त्या दिल्या. त्यामुळे हजारो ग्रंथ निर्माण झाले. नव्या लेखकांना प्रोत्साहन मिळाले. असे राजाश्रयीत कार्य भारतामध्ये फारसे झालेले नाही असे अद्वितीय कार्ये करणारे सयाजीराव गायकवाड यांचे कार्य संशोधनाच्या अंगाने दुर्लक्षित राहिले आहे. हा अभ्यास होणे फार-फार महत्त्वाचा आहे.

पत्रव्यवहार नवनिर्मिती प्रतिभेचा संवेदनशील अविष्कार असतो. वाङ्मयीन विविध मूल्यांचा उत्तम अविष्कार त्यातून झालेला असतो. अन्य वाङ्मय प्रकारात जी वाङ्मयीन मूलय असता तशीच वाङ्मयीन मूल्य 'पत्रव्यवहार' वाङ्मयाला असतात. या दृष्टीने सयाजीराव गायकवाडाचा पत्रव्यवहार अस्सल वाङ्मय मूल्यांनी परिपूर्ण आणि संपन्न आहे. या पत्रव्यवहाराचा अभ्यास मराठी वाङ्मयाच्या दालनात मोलाची भर घालेल.

विषय निवडीमागील भूमिका :

राजेशाहीचा अस्त आणि परकीयांच्या गुलामीच्या सत्तेचा उदय या पार्श्वभूमीवर बडोदा संस्थानचे सामाजिक कार्ये भारतीय इतिहासात अनमोल आहे. तत्कालीन काळातील समाज

जीवन, साहित्य, संस्कृती आणि मानवी मनाचा उत्तम अविष्कार सयाजीराव गायकवाड यांच्या पत्रव्यवहारातून झालेला आहे. अशा पत्राचा अभ्यास झाल्यास तत्कालीन वाङ्मयाचे स्वरूप समजण्यास मदत होईल.

सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या राजश्रायामध्ये विविध घटकांना योग्य न्याय दिला. सर्व सामान्य समाजातील तरूणांना शिक्षणासाठी, ग्रंथलेखनास, स्वातंत्र्य लढ्यास सर्वोतोपरी प्रोत्साहन दिले. त्यांच्या प्रेरणेने समाजामध्ये नवी पिढी उभी राहिली. देशाच्या विविध क्षेत्रातील जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या. नवा समाज त्याच्या प्रेरणेने, विचाराने घडला. या बाबीचा शोध खोलात जाऊन घेण्यासाठी आणि सयाजीराव गायकवाडांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व अन्य पत्रव्यवहारातील वाङ्मयीन मूल्य शोधण्यासाठी हा विषय मी निवडला आहे.

संशोधन विषयाची उद्दिष्टे :

1. तत्कालीन काळातील सामाजिक-राजकीय आणि वाङ्मयीन स्थित्यंतराचा अभ्यास करणे.
2. सयाजीराव गायकवाड यांच्या पत्रव्यवहाराचे वाङ्मयीन मूल्य अभ्यासणे आणि ती तपशिलवार नोंदविणे.
3. सयाजीराव गायकवाड यांच्या पत्रव्यवहारातील वाङ्मयीन घटकांचा अभ्यास करणे.
4. सयाजीराव गायकवाड यांच्या पत्रव्यवहारातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक ववाङ्मयीन विचार शोधणे.
5. सयाजीराव गायकवाड यांच्या पत्रव्यवहारातील प्रतिमा, रूपके, शब्द सामर्थ्य, म्हणी, वाक्प्रचार आणि प्रतिभा इत्यादीचा अभ्यास करणे.
6. सयाजीराव गायकवाड यांच्या पत्रव्यवहारातून व्यक्त झालेल्या भाव-भावना, विचार आणि दृष्ट्येपण इत्यादीचा अभ्यास करणे.
7. सयाजीराव गायकवाड यांच्या पत्रव्यवहारातील वाङ्मयीन जाणीवांचा चिकित्सक अभ्यास करणे.

8. सयाजीराव गायकवाड यांच्या पत्रव्यवहारातील शैलीमीमांसा करणे.

9. सयाजीराव गायकवाड यांच्या वाङ्मयीन जाणीवांचा अभ्यास करणे.

10. सयाजीराव गायकवाड जीवन चरित्र, शिक्षण आणि कार्य इत्यादीचा अभ्यास करणे.

विषयाचे पूर्व संशोधन :

प्रस्तुत विषयाच्या संदर्भाने विद्यापीठ स्तरावर झालेल्या इतर पूरक या वाङ्मयाचे पीएच.डी. संशोधनाचा आढावा पुढील प्रमाणे.

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रव्यवहाराचा वाङ्मयीन अभ्यास : माधवी खरात (अभ्यासक), पुणे विद्यापीठ पुणे- 1994.
2. मराठेशाहीतील पत्ररूप गद्याचे वाङ्मयीन समीक्षण : सुधाकर पवार (अभ्यासक), शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर-1974.
3. यशवंतराव चव्हाण यांच्या पत्रव्यवहाराचा चिकित्सक अभ्यास : जयकर दमामे (अभ्यासक) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर -2018.

संशोधन पद्धती :

'सयाजीराव गायकवाड यांच्या पत्ररूप गद्याचे वाङ्मयीन समीक्षण' या संशोधनासाठी चिकित्सा, विश्लेषण आणि संश्लेषण संशोधन पद्धतीचा उपयोग केला जाणार आहे. त्यामुळे निष्कर्ष योग्य मिळविण्यास सोयीचे असेल.

संशोधन साधने :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनाचा उपयोग केला जाणार आहे. त्याचबरोबर संशोधनासाठी सहाय्यक साधनाचा उपयोग केला जाणार आहे.

1. प्राथमिक साधने :-

   तत्कालीन काळातील वर्तमान पत्रे, ग्रंथ, संस्थानातील कागदपत्रे आणि पत्रव्यवहार इत्यादीचा उपयोग केला जाणार आहे.

2. दुय्यम साधने :-

   या साधनामध्ये ग्रंथालयातील ग्रंथ, सयाजीराव गायकवाड यांच्या संदर्भातील ग्रंथ, लेख आणि संशोधन साहित्य इत्यादीचा उपयोग केला जाणार आहे.

प्रकरणाची विभागणी :

सदरचा अभ्यास करण्यासाठी प्रकरणाची स्थुल विभागणी पुढील प्रमाणे आहे. या प्रकरणाच्या विभागणीसाठी मार्गदर्शकांचा सल्ला घेतलेला आहे. (अभ्यासांत प्रस्तुत आराखड्यांमध्ये मार्गदर्शकांच्या मान्यतेने आवश्यकतेनुसार बदल केला जाईल.)

प्रकरण 1 ले : उपोद्‌धात

1.1 हेतूकथन

1.2 अभ्यासाचा कालखंड

1.3 पत्राचे प्रामाण्य.

1.4 पत्रलेखन व पत्रलेखनिक

1.5 सयाजीराव गायकवाड यांचा पत्रव्यवहार

1.6 पत्रव्यवहारातील वाङ्मयीन अभ्यासाची आवश्यकता

1.7 वाङ्मयीन अभ्यासाची दिशा

1.8 सयाजीराव गायकवाड यांचे व्यक्तिमत्त्व

1.9 मनुष्य स्वभावाचे दर्शन.

प्रकरण 2 रे : सयाजीराव गायकवाड जीवन चरित्र.

2.1 सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी

2.2 जन्म व बालपण

2.3 संस्कार व शिक्षण

2.4 राज्याभिषेक व राज्यप्रवेश

2.5 शैक्षणिक कार्य

2.6 राजकीय कार्य

2.7 वाङ्मयीन कार्य

2.8 सामाजिक कार्य

2.9 स्वातंत्र्य चळवळीबाबत कार्य

2.10 म.फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संबंध.

2.11 कार्यात्मक संघर्ष.

प्रकरण 3 रे : सयाजीराव गायकवाड यांच्या पत्रव्यवहारातील सामाजिक, सांस्कृतिक जाणीवा.

3.1 जाती जमाती विषयक धोरण

3.2 धार्मिकतेबाबत विचार- धोरण

3.3 स्वातंत्र्य विषयक धोरण

3.4 समता, न्याय, बंधुता विषयक धोरण

3.5 स्त्रीविषयक धोरण

3.6 शिक्षण विषयक धोरण

3.7 सण, उत्सव.

3.8 तिर्थक्षेत्र, पर्यटन विषयक विचार

3.9 देवस्थान विषयक विचार

3.10 कला विषयक धोरण

3.11 संगीत, अभिनय, नृत्य, चित्रशिल्प, लोककला

3.12 क्रिडा विषयक धोरण

3.13 पाप-पुण्य कल्पना

3.14 देवदेवतांबाबत विचार

3.15 न्यायदान व शिक्षा

3.16 वसतीगृह विषयक धोरण

3.17 शैक्षणिक शिष्यवृत्ती विचार-धोरण

प्रकरण 4 थे सयाजीराव गायकवाड यांच्या पत्रव्यवहारातील वाङ्मयीन जाणिवा.

4.1 वाङ्मयीन प्रयोजन

4.2 सामाजिक जाणीवेतून कलात्मक वाङ्मयीन निर्मिती

4.3 वाङ्मयातून सामाजिक मूल्यनिर्मिती.

4.4 सर्वव्यापी वाङ्मयाचा परीघ.

4.5 भाषाविषयक विचार व धोरण

4.6 लोकसाहित्य विषयक विचार

4.7 वाङ्मयीन निर्मितीची प्रेरणा

4.8 आशय

4.9 प्रतिमा रूपक, अलंकार

4.10 पत्रव्यवहारातील नादमधूर शब्द योजना.

4.11 पत्रव्यवहारातील समानार्थी शब्द,

4.12 पत्रव्यवहारातील विरूद्धार्थी शब्द

4.13 पत्रव्यवहारातील अनेकार्थी शब्द

4.14 पत्रव्यवहारातील इतर भाषेतील शब्द व शब्दप्रयोग

प्रकरण 5 वे सयाजीराव गायकवाड यांच्या पत्रव्यवहाराचे वाङ्मयीन मूल्यमापन

सयाजीराव गायकवाड सामाजिक व संस्थानिक दृष्ट्या प्रभावशाली व्यक्तीमत्त्व होते. त्यांचा एकूणच पत्रव्यवहार वैचारिक भूमिकेतून झालेला आहे. त्याच्या पत्राचा आशय सामाजिक दृष्ट्या, वाङ्मयीन दृष्ट्या, सांस्कृतिक दृष्ट्या, राजकिय दृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या अनुषंगाने राष्ट्रीय नेत्यांशी त्यांचा पत्रव्यवहार झालेला आहे. तत्कालीन काळातील वैचारिक राष्ट्रीय पिढी घडविण्याच्या पत्रव्यवहाराचा वाङ्मयीन अभ्यास होणे महत्त्वाचे आहे असे संशोधकाला वाटते.

प्रकरण 6 वे उपसंहार : प्रस्तुत प्रकरणामध्ये वरिल सर्व प्रकरणांमधून आलेल्या निष्कर्षाचा अभ्यास करावयाचा आहे.

सयाजीराव गायकवाड यांचा जन्म, बालपण, शिक्षण आणि संस्कार सामान्य व्यक्ती म्हणून जसे झालेले आहे तसे असामान्य व्यक्तीमत्त्व म्हणूनही झालेले आहे. या दृष्टीने अभ्यास होणे महत्त्वाचे आहे. सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक, सांस्कृतिक धोरण काळाच्या पुढे जावून विचार करणारे होते. या त्यांच्या प्रभावातून नव्या पिढीचा उदय झाला. सयाजीराव गायकवाड यांचा ग्रंथव्यासंग उच्च दर्जाचा असल्यामुळे त्यांच्या पत्रव्यवहारातून उत्तम वाङ्मयीन जाणीवा व्यक्त झालेल्या आहेत. या दृष्टीने अभ्यास होण्याची गरज आहे.

परिशिष्ट्ये :-

1. सयाजीराव गायकवाड यांची वंशावळी.
2. सयाजीराव गायकवाड यांचे मराठी, गुजराती व इंग्रजी हस्ताक्षर.
3. महत्त्वाचे दोन तीन पत्रे.

संदर्भ सूची :

1. ग्रंथ.

   1. सयाजीराव गायकवाड पत्रसंभार (संपा)

   (खंड 1, 2, 3) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई -2016

2. पीएच. डी. प्रबंध :

   1. खरात माधवी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रव्यवहाराचा वाङ्मयाचा अभ्यास. पुणे विद्यापीठ - पुणे 1993
   2. पवार सुधाकर : मराठे शाहीतील पत्रातील गद्याचे वाङ्मयीन समीकरण शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर - 1974
   3. दभात्रे जयकर : यशवंतराव चव्हाण यांच्या पत्रव्यवहाराचा वाङ्मयीन अभ्यास शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर -2018.
   4. बाबा भांड : युगद्रुष्टा महाराजा सयाजीराव गायकवाड, जेनेरिक प्रकाशन, जाने.2015.
   5. सौ. चंद्रलेखा बेलसरे : लोकनायक महाराजा सयाजीराव गायकवाड, जेनेरिक प्रकाशन, जाने. 2015.
   6. : बाबा भांड : लोकपाळ राजा सयाजीराव जाने. 2015.
   7. सौ. मंदा हिंगुराव : अनुवाद डॉ. सुषमा करोगल : महाराजा सयाजीराव गायकवाड आणि स्त्री शिक्षण, साकेत प्रकाशन पुणे, जाने. 2015.
   8. बाबा भांड : सृष्टीची सेवा इश्वराची मैत्री - धर्मविषयक विचार सयाजीराव गायकवाड साकेत प्रकाशन पुणे, जाने. 2015.

9. निंबाजीराव पवार : जेंव्हा गुराखी राजा होतो - श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड, राजहंस प्रकाशन.
10. बाबा भांड : स्वातंत्र्य लढ्याचे पाठीराखे - सयाजीराव गायकवाड :
11. बाबा भांड : महाराजा सयाजीराव गाथा युग पुरूषाची (25 खंडीय), साकेत प्रकाशन पुणे.
12. प्रा. गौतम निकम : लोककल्याणकारी राजा सयाजीराव गायकवाड, विमल किर्ती प्रकाशन.
13. सयाजीराव गायकवाड यांची भाषणे - खंड 1 ते 5, साकेत प्रकाशन पुणे.
14. बाबा भांड : सयाजीराव गायकवाड, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर - साकेत प्रकाशन पुणे.
15. Sayajirao of Barboda - The prince and the man : Fattesinghrao Gaekwad, Popular Prakashan, January 2008

मार्गदर्शक

प्रा. डॉ. आनंद गोविंदराव इंजेगावकर
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
स्व. नितीन महाविद्यालय पाथरी जि. परभणी

संशोधक

दुर्गा बापुसाहेब जाधव